# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार**
**यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,**
**जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१**
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४२०/२०२३ दिनांक – ०९/१२/२०२३

## भारतामध्ये अवैध पणे वास्तव्य करणाऱ्या एक बांगलादेशी वेश्यादलाल यास अटक करुन एक बांगलादेशी अल्पवयीन मुलीसह ०३ बांगलादेशी पिडीत महिलांची वेश्या व्यवसायातुन सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश

दिनांक ०८/१२/२०२३ रोजी ०९.०० वा. सुमारास अर्नाळा पोलीस ठाण्याचे हद्दीत बिल्डींग नं.७ डी रुम नं.२१०४ म्हाडा कॉलनी, नालासोपारा विरार लिंक रोड विरार पश्चिम येथे एक वेश्यादलाल पुरुष नामे अशोक दास हा बांगलादेश येथुन अवैध मार्गाने मुलींना घेवुन येवुन त्यांना त्याचे राहते घरी ठेवुन वेश्यागमनाचा मोबदला, कमिशन व रुम भाडे घेवुन वेश्यागमनाकरीता मुली पुरवित आहे. तसेच पिडीत मुलींना ग्रॅन्ट रोड येथे वेश्यागमनासाठी पाठवित आहे. अशी माहिती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक, संतोष चौधरी यांना त्यांचे खास बातमिदारामार्फत मिळाली. त्यावर सप्रेम मुंबई स्माईल फांउडेशन चे सदस्य, दोन लायक पंच, बोगस गिऱ्हाईक यांना कार्यालयात बोलावुन त्यांना छापा कारवाई बाबत माहिती देवुन, म्हाडा कॉलनी विरार येथे रवाना छापा टाकुन, पिडीत महिलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश मिळाले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, बोगस गिऱ्हाईक तयार करुन त्यास नमुद वेश्यादलाल याचेकडे मिळालेल्या माहीतीच्या आधारे अशोक दास यास संपर्क साधुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली असता त्याने त्याचे व्हॉट्रसॲप वर दोन मुलींचे फोटो पाठवुन एक मुलगी रुमवर बघायला मिळेल व एका मुलीचे वेश्यागमनासाठी १०,०००/- रु. लागतील असे सांगुन त्याने त्याचे रुमवर बिल्डींग नं.७ डी रुम नं.२१०४ येथे बोलावले.

त्यानंतर आरोपी याने एक अल्पवयीन मुलगी बोगस गिऱ्हाईक यास उपलब्ध करुन दिली, त्यानंतर बोगस गिऱ्हाईक यांनी मोबाईलद्वरे मिसकॉल करुन आम्हास इशारा केल्यानंतर पथकाने छापा कारवाई करुन आरोपी नामे अशोक हराणु दास वय ५४ वर्षे रा. बिल्डींग नं.७ डी रुम नं.२१०४ म्हाडा कॉलनी, नालासोपारा विरार लिंक रोड, विरार पश्चिम, ता.वसई जि.पालघर मुळ रा.ढाका बांग्लादेश यास ताब्यात घेतले व त्याने वेश्यागमनासाठी उपलब्ध करुन दिलेली १७ वर्षे वयाची अल्पवयीन मुलगी हिची सुटका केली.

त्यानंतर त्याचेकडे अधीक चौकशी केली असता त्याने सांगितले की, मी १५ वर्षापुर्वी ढाका येथुन दिल्ली येथे कुंटुबासह राहण्यास आलो असुन मुंबई येथे काही वर्षापुर्वी कामाकरीता आलो होतो. त्यानंतर मी वेगवेगळया राज्यातुन, बांगलादेशातुन मुलींना पैशाचे आमिष दाखवुन त्यांना मुंबई विरार येथे माझ्या रुमवर घेवुन येतो. त्यानंतर मी ग्रॅड रोड मुंबई येथे माझ्या ओळखीचा मनोज यादव आणि बासु या नावाच्या दलालांकडे घेवुन जातो व तेथे गेल्यावर त्यांच्या ताब्यात देण्यापुर्वी मी प्रत्येक मुलीचे सहा-सात महिन्याचे वेश्याव्यवसायाचे काम करणेकरीता करार करतो व त्या प्रत्येक मुलींचे वेश्यागमनाचे काम करण्याचे मला दर महिन्याला २०,०००/- रू. मिळतात. अशा एकुण मागिल दोन वर्षात सुमारे २०० ते २५० मुली वेगवेगळया राज्यातुन तसेच बांग्लादेशातुन आणल्या असुन ग्रॅन्ड रोड येथे बासु व मनोज यादव याचेकडे वेश्याव्यवसायाकरीता कामाकरीता पाठविलेल्या असल्याबाबत त्याने माहिती दिली. त्यानंतर त्याच्याकडे संखोल चौकशी करता त्याने आणखी दोन बांगलादेशी मुली प्रगतीनगर येथे एका रुमवर आणुन ठेवलेल्या असल्याबाबत माहिती मिळाल्याने तात्काळ प्रगतीनगर येथील दोन मुळ बांगलादेशी मुली दोघींचे वय-२३ यांची पथकाने सुटका करुन अंतरराष्ट्रीय अवैध मानवी तस्करी विरोधात कारवाई करुन आरोपींच्या विरुध्द अर्नाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ३८७/२०२३ भादविस कलम ३६६(अ), ३७०(१)(३), ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ पोक्सो १७,१८ तसेच भारतीय पासपोर्ट अधिनियम १९२० चे कलम ३(अ)(ब),६(अ)सह १२, विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाल यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/संतोष चौधरी, पोहवा/किणी, शेटये, शिंदे, मपोहवा/ डोईफोडे, तिवले, पाटील, चालक पोहवा/०७०६६ पागी, सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा, व सप्रेम मुंबई स्माईल फांउडेशन चे सदस्य यांनी केली आहे.

**----0000----**